# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

### प्रेस नोट

**दिनांक २८/०९/२०२२ (बुधवार)**

**(सायंकाळ)**

---

### बकरी चोरी करणाऱ्या आरोपीस अटक
### स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामिण यांची कारवाई....

स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामिण पोलीस यांनी जिल्हयातील पोस्टे मौदा अप क्र ५४१/२२ कलम ३७९ भादवि, पोस्टे कन्हान अप क्र ४४९/२२ कलम ३७९ भादवि व पोस्टे वेलतुर अप क्र ९५/२२ कलम ३७९ भादवि अन्वये गुन्हे नोंद करण्यात आल्याने जनावर (बकरी) चोरीच्या वाढत्या घटना पाहता, मा.पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामिण यांनी स्थानिक गुन्हे शाखा यांना दिलेल्या निर्देशाप्रमाणे पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामिण यांनी त्यांचे विशेष पथक तयार करून सदर गुन्हयाचे अनुषंगाने संमातर तपासाचे दिलेले आदेशान्वये दि. २७/०९/२०२२ रोजी कन्हान उपविभागात सदर पथक आरोपीचा शोध व गस्त करीत असता त्यांना माहिती मिळाली की मौदा, कन्हान, वेलतुर हद्दीत बकरी जनावरे चोरणारा इसम पोलीस स्टेशन कामठी नागपूर शहर चे हद्दीतील जय स्तंभ चौक येथे फिरत असून ताचे नाव लोकेश दोनोडे रा. अंगुरी नगर, गोंदिया ह.मु. प्रजापती नगर, नागपूर आहे. अशी माहिती मिळाल्यानंतर स्थानिक गुन्हे शोखेच्या पथकाने नमूद ठिकाणी पोहचून आरोपी इसमाची ओळख पटवून त्याला ताब्यात घेऊन सखोल विचारपूस केली असता आरोपी ने आपल्या साथीदार अंशु क्रीपाणकार रा. पारडी नागपूर याचे सोबत मिळून बकऱ्या चोरी केले असलायचे कबूल केले. पूढील कायदेशिर कार्यवाही करिता आरोपीस पोलीस स्टेशन मौदा चे ताब्यात देण्यात आले

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक राहुल माकणिकर यांचे आदेशान्वये स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे यांचे मार्गदर्शनात सहा. पोलीस निरीक्षक अनिल राउत, पोलीस हवालदार विनोद काळे, नाना राउत, अरविंद भगत, पोलीस नाईक शैलेश, प्रणय, विरेन्द्र नरड, चापोना शुक्ला यांचे पथकाने पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**